क्रमांक:- पीओअेस-१०९०/६०१ समाप/स्वासैकक्ष,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- २३ एप्रिल १९९०.

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी

विषय:- स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन मंजूर करतांना घ्यावयाची काळजी.

भूमिगत स्वातंत्र्य सैनिकांना पेन्शन मंजूर करतांना दोन नामवंत स्वातंत्र्य सैनिकांची प्रमाणपत्रे आवश्यक ठरविण्यात आलेली आहेत. अशी प्रमाणपत्रे जेव्हा सादर करण्यात येतात त्यावेळी ती प्रमाणपत्रे खरोखरच नामवंत स्वातंत्र्य सैनिकांची आहेत किंवा कसे याबाबत पडताळणी करण्याची काहीच व्यवस्था नाही. तरी यापुढे नामवंत स्वातंत्र्य सैनिकाचे प्रमाणपत्र मागविले असेल त्या सर्व प्रकरणात ते ~~xप्रमाणपत्र xमागविले xअसेल xत्या xसर्व xप्रकरणात~~ ते प्रमाणपत्र देणा-याने आपला पेन्शन क्रमांक त्या प्रमाणपत्रावर घालणे व सोबत सन्मानपत्राची प्रत जोडणे आवश्यक ठरविण्यात आले आहे. तसेच ते प्रमाणपत्र जिल्हाधिकारी कार्यालयातील स्वातंत्र्य सैनिक गौरव समितीचे सदस्य-सचिव म्हणजे उपजिल्हाधिकारी यांनी ही सही नामवंत स्वातंत्र्य सैनिकांचीच आहे याबाबत प्रतिस्वाक्षरी करावी.

२. यापुढे स्वातंत्र्य सैनिकांनी आपला पेन्शन क्रमांक आणि उपजिल्हाधिकारी यांच्याकडून प्रतिस्वाक्षरीत केलेले प्रमाणपत्र दिलेले असेल तरच ते ग्राह्य धरण्यात यावे.

आपली,
(मिशरानडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
अध्यक्ष, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, मंत्रालय, मुंबई,
मा. राज्यमंत्री, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई,
मा. सभापती, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती यांना त्यांच्या पत्र क्रमांक ७८७८/९० स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती, दि. १६.४.९० च्या संदर्भात माहितीसाठी सादर.
सदस्य सचिव, स्वातंत्र्य सैनिक उच्चाधिकार समिती.
निवड फाईल २ प्रती
सर्व साधारण नस्तीसाठी.

वे. २१४९०.

सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर [२ प्रती],

सर्व मंत्रालयीन विभाग,
माहिती व जनसंपर्क संचालनालय [प्रसिध्दीपत्रक काढण्यासाठी],
निवड फाईल [२ प्रती],
सर्वसाधारण नस्तीसाठी.